**रे.दि.मु.क्र.४७/२०२१**
(यशवंत वि. मनोहर)

**आदेश नि.५२ खाली**
(आदेश पारीत दि.१४/०६/२०२४)

सदरचा अर्ज वादीचे वारस क्र.१अ यांनी वादी यांचे विरुध्द पारीत करण्यात आलेला "दावा अवसान" चा आदेश रद्द करुन मिळण्यासाठी झालेला विलंब माफ करुन मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**वादीचे वारस क्र.१अ चे कथन –**

२. वादी यशवंत भागोजी हळदे हे दि.१५/०२/२०२३ रोजी मिरज येथे मयत झालेले आहेत. त्यांचा मृत्युचा दाखला मिळणेकरिता जवळ जवळ दिड महिना लागला. वादीचा मृत्यु दाखला हा त्यांचे वारसांना दि.३१/०३/२०२३ रोजी मिळाला आहे. वादीचा मुखत्यार म्हणून मुलगा यास त्याचे नोकरीतील अडचणीमुळे त्यांचे वकिलांची भेट घेता आली नाही. त्यामुळे वादीचे वारस अभिलेखावर घेण्यास ७ महिने २७ दिवसांचा विलंब झालेला आहे. तरी सदरचा झालेला विलंब माफ करण्यात यावा अशी विनंती वादीचे वारस क्र.१ यांनी केली आहे.

**प्रतिवादी क्र.१३,१५,२०,२३ ते २५,२७ व ३० तर्फे म्हणणे–**

३. सदर प्रतिवादींनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन योग्य ते आदेश करणेची विनंती केली आहे.

४. अर्जाचे, म्हणण्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. उभय पक्षकारांतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. **मुदतीचा कायदा अर्टिकल १२०** अन्वये उभय पक्षकारांमधील कोणतीही पक्षकार मयत झाल्यानंतर त्याचे वारस हे मृत्यु तारखेपासून ९० दिवसांमध्ये अभिलेखावर घेणे अपेक्षीत असते. तसे न झाल्यास दावा हा त्या पक्षकाराविरुध्द अवसान होतो, तर दावा अवसान झाल्यानंतर **मुदतीचा कायदा अर्टिकल १२१** नुसार सदर पक्षकाराने अवसान रद्द करुन मिळण्यासाठी ६० दिवसांचे आत न्यायालयात अर्ज दाखल करणे आवश्यक असते.

६. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यशवंत भागोजी हळदे हे दि.१५/०२/२०२३ रोजी मिरज येथे मयत झालेले आहेत. सदरची बाब दर्शविण्यासाठी वादीतर्फे नि.५७/१ च्या यादीसोबत मृत्यु दाखला देखील हजर केलेला आहे. सबब याकामी वादी वारसांनी दि.१५/०७/२०२३ पर्यन्त वादी विरुध्द झालेला दावा अवसानचा आदेश रद्द करुन मागणे अपेक्षीत होते. सबब विलंब माफ करुन मिळण्यास वादीस सुमारे ५ महिने २७ दिवसांचा विलंब झालेला आहे. अर्जामधील नमुद कारणांचे पुष्ठयर्थ वादी वारसांनी कोणतेही कागदपत्र जोडलेले नाहीत. परंतु प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे याकामी झालेला विलंब माफ करुन वादीचे वारस अभिलेखावर घेणे

उचित राहिल. परंतु वादी वारसांनी केलेल्या विलंबासाठी वादीवर प्रस्तुत अर्जाचा खर्च लादणे उचित राहिल. सबब वरील सर्व कारणांचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे–

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी विरुध्द अवसान (Abate) झालेला दावा रद्द करुन मिळण्यासाठी झालेला विलंब हा प्रतिवादी क्र.१३,१५,२०,२३ ते २५,२७ व ३० यांना वादी वारस क्र.१अ यांनी एकत्रीतरित्या रक्कम रु.१०००/–खर्च म्हणून देण्याचे अटीवर रद्द करण्यात येतो.

३. सदर आदेशाची पुर्तता वादीने पुढील तारखेस करावी.

४. सदर आदेशाची नोंद उभय पक्षकारांनी घ्यावी.

दिनांक १४/०६/२०२४.

(एम.आर. काळे)
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर, चिपळूण.